# दि आजरा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. (मल्टि-स्टेट)

३९३ बी, मेन रोड, आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर

## निष्क्रिय/भाडे न भरलेले लॉकर-ब्रेक-ओपन नोटीस

दि आजरा अर्बन को. ऑप. बँक लि., आजरा बँकेच्या निष्क्रिय/भाडे न भरलेल्या सर्व लॉकर धारकांना जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येत आहे कि, रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार ग्राहकाचा लॉकर सात वर्षाच्या कालावधीसाठी निष्क्रिय राहिल्यास (वापर न केल्यास) किंवा ग्राहकाने वार्षिक भाडे भरले नसेल तर रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार, नियमांनुसार व मार्गदर्शक सुचनेनुसार योग्य प्रक्रियेचे पालन करून सदर लॉकर ब्रेक-ओपन करण्याचा अधिकार बँकेला आहे. त्यानुसार अटी-शर्तीचे पालन न करणाऱ्या निष्क्रिय/भाडे न भरलेल्या लॉकर धारकांचे लॉकर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्यानंतर रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार व कायदेशीर तरतुदीनुसार बँकेकडून ब्रेक-ओपन करणेत येतील व त्यामधील वस्तुंचा पंचनामा करून सदर वस्तू बँकेच्या ताब्यात ठेवणेत येतील. तरी निष्क्रिय/भाडे न भरलेल्या लॉकर धारकांनी आवश्यक पुर्तता करून आपला लॉकर नियमित ऑपरेट करून घ्यावा. सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याच्या आत सदर लॉकर ऑपरेट न झाल्यास व त्याअनुषंगाने बँकेने लॉकर ब्रेक-ओपनची कारवाई केलेस होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस बँक जबाबदार राहणार नाही. याबाबतच्या अधिक माहितीसाठी नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा. तसेच शाखा संपर्क तपशील बँकेच्या www.ajarabank.com या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध आहे. लॉकर प्रक्रिया पूर्ण करणेसाठी तुमच्या त्वरित आणि सकारात्मक प्रतिसादाची आम्ही वाट पाहत आहोत, जेणेकरून तुम्हाला अधिक चांगली सेवा देणेसाठी बँकेला मदत होईल.

ठिकाण : आजरा

दिनांक : ०४/०४/२०२४

सही/-

मुख्य कार्यकारी अधिकारी